N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** लातूर **P.S.(ठाणे):** शिवाजी नगर **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0022 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 15/01/2019 23:55 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 15/01/2019
**Date To ( दिनांक पर्यंत):** 15/01/2019
**Time From (वेळेपासून):** 15:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 21:30 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 15/01/2019 **Time (वेळ):** 23:40 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद** 034 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 15/01/2019 23:40 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** Oral

**5. Place of Occurrence (घटनास्तळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 0.2 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** पुरणमल लाहोटी शासकिय,तंत्रनिकेतनच्या गेटच्या बाजुस ,असणारे कष्णा ज्युस सेंटर लातूर

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** कुमार भगवान दराडे पोलीस निरीक्षक

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)**

**(c) Date/Year of Birth (जन्म** 1977 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**

**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

Scanned by CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,लातूर,लातूर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,लातूर,लातूर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.): 91-9657709841**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राजेंद्र रघुनाथ भुतेकर | | | 1. कोकाटे नगर,, लातूर ,लातूर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 1000 | 1,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 1,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

सरकार तर्फे फिर्याद दिनांक 15/01/2019मी कुमार भगवान दराडे वय 42 वर्ष, व्यवसाय शासकीय नोकरी पद पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर. मो.नं. 9657709841सरकार तर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देतो की, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर येथे पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे.आम्ही आज दिनांक 15/01/2019 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग लातूर येथे हजर असतांना तक्रारदार परमेश्वर महादेव पावले वय 39 वर्ष व्यवसाय नौकरी रा. जुना औसा रोड लातूर यांनी कार्यालयात येवुन त्यांची एका लोकसेवकाविरुध्द तक्रार असल्याचे पोलीस उपअधीक्षक यांना सांगीतले. त्यांनी लगेच आम्हास बोलावुन सापळा अधिकारी म्हणुन काम करण्यास सांगुन त्यांच्याकडे गोपनिय कामासाठी हजर असलेल्या दोन शासकिय पंचाना कार्यालयात बोलावुन घेवुन त्यांना तक्रारदार व सापळा पथकातील सदस्यांची ओळख करुन दिली. त्यानंतर तक्रारदार पावले यांनी पंचासमक्ष त्यांची तोंडी तक्रार सांगुन लेखी तक्रार दिली की, श् त्यांना लातूर येथे प्लाट खरेदी करावयाचा असल्याने मी माझे भविष्य निर्वाह निधीमधुन दोन लाख रुपये मिळावे म्हणुन मी वेतन विभाग (माध्यमिक शिक्षण) लातूर यांचेकडे दिनांक 14/01/2019 रोजी प्रस्ताव दाखल केला असुन मी संबधीत क्लार्क यांचेकडे जावुन माझे भविष्य निर्वाह निधीची रक्कम लवकर पाहिजे असल्याचे सांगीतले तेंव्हा तेथील क्लार्क यांनी माझेकडे पैशाची मागणी केली आहे. सदर तक्रारीवर आम्ही व दोन्ही पंचानी सहया करुन आमचे, दोन्ही पंच व तक्रारदार यांचे वक्तव्य डिजीटल व्हाईस रेकार्डरमध्ये ध्वनिमुद्रीत करुन लाप्रवि कार्यालय लातूर येथुन मोटारसायकलवर सापळा पथकातील सदस्य सापळा साहित्यासह रवाना होवुन विशाल नगर, लातूर येथील साईबाबा मंदीर परिसरात आडबाजुस थांबुन तक्रारदार पावले यांना वेतन विभाग (माध्यमिक) लातूर येथील क्लार्क यांनी त्यांचे वरील नमुद कामासाठी त्यांना लाचेची मागणी केली आहे अगर कसे ? याची पंचासमक्ष पडताळणी करणे आवश्यक असल्याने पोका धारेकर यांचे मदतीने डिजीटल व्हाईस रेकार्डरमध्ये नविन मेमरीकार्ड घालुन ते सुरु करुन तक्रारदार पावले यांचे गळयात आडकावुन तक्रारदार व पंच क्रमांक 1 उगीले यांना प्रशासकिय ईमारत लातूर येथे असणारे वेतन विभाग (माध्यमिक) येथील क्लार्क यांचेकडे पाठवुन लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता वेतन विभाग, लातूर येथील क्लार्क यांनी तक्रारदार यांचे भविश्य निर्वाह निधीमधील रक्कम लवकर मिळवुन देण्याचे कामासाठी तक्रारदार पावले यांना पंचासमक्ष 2,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 1,000/- रुपये घेण्याचे मान्य करुन लाचेची रक्कम घेवुन येण्यास सांगीतल्याचे निष्पन्न झाले. दोन्ही पंचाना तसेच तक्रारदार यांना अन्थ्रासीन पावडर व आल्ट्रा व्हायलेट दिव्याचे गुणधर्म सांगुण त्याचे प्रात्यक्षीक पोका भोंग यांचे मार्फतीने विषाल नगर लातूर येथील साईबाबा मंदीरचे परिसरात आडबाजुस करुन दाखवुन लाच म्हणुन दयावयाचे 1,000/- रुपये (ज्यात 500/-रुपये दराच्या 02 चलनी नोटा ) यास अंन्था◌्रसिन पावडर लावुन लाचेच्या नोटांचे क्रमांक व वर्णन पंचासमक्ष लिहुन घेवुन त्या नोटा तक्रारदार यांचे अंगातील शर्टचे छातीवरील डावे बाजुच्या खिषात ठेवुन लाचेची रक्कम दिल्यानंतर तक्रारदार यांना त्यांचे खिषातील हातरुमाल



Scanned by CamScanner

काढुन तोंड पुसणेबाबतचा सुनियोजीत ईषारा म्हणुन सांगण्यात आला. पोका धारेकर यांचे मदतीने डिजीटल व्हाईस रेकार्डरचे बटन चालु करुन तक्रारदार पावले यांचे गळयात अडकावुन तक्रारदार पावले व पंच क्रमांक 1 उगीले यांना प्रशासकिय ईमारत लातूर मधील वेतन विभाग (माध्यमिक) येथील क्लार्क यांची भेट घेण्यासाठी रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पोलीस उपअधीक्षक बेद्रे, सापळा पथकातील सदस्य पंच क्रमांक 2 उपाडे यांचेसह येणारे जाणारे लोकांमध्ये मिसळुन प्रशासकिय ईमारत लातूरचे तळमजल्यात आजुबाजुस थांबुन तक्रारदार व पंच क्रमांक 1 उगीले यांना दृष्टीक्षेपात ठेवुन लाच स्विकृतीच्या सुनियोजीत ईषा-याची वाट पाहत थांबुन राहिलो. तक्रारदार व पंच क्रमांक 1 उगीले हे एका मजबुत बांध्याच्या ईसमासोबत ब-याच वेळाने बाहेर येवुन आपआपली मोटारसायकल काढुन निघुन जात असतांना दिसल्याने आम्ही पोलीस उपअधीक्षक बेदे्र व सापळा पथकातील सदस्य तात्काळ आमच्या मोटारसायकल काढुन पंच क्रमांक 2 यांचेसह त्यांचे पाठीमागे निघालो असता ते शिवाजी चौक ते औसा रोडवरील पुरणमल लाहोटी शासकिय तंत्रनिकेतनच्या गेटच्या बाजुस असणारे कृष्णा ज्युस सेंटरजवळ मोटारसायकल उभी करुन खुर्चीवर बसलेले दिसले. त्याठिकाणी आम्ही तेथे येणारे जाणारे लोकांमध्ये मिसळुन तक्रारदार व पंच क्रमांक 1 उगीले यांना दृष्टीक्षेपात ठेवुन लाच स्विकृतीच्या सुनियोजीत ईषा-याची वाट पाहत थांबुन राहिलो.अंदाजे 18.40 वाजण्याचे सुमारास तक्रारदार पावले यांनी खुर्चीवरुनच सापळा पथकाचे निदर्षनास पडेल अषा पध्दतीने लाच स्वीकृतीचा पुर्व नियोजीत इषारा केला. त्यानंतर आम्ही, पंच क्रमांक 2 उपाडे व सापळा पथकातील सदस्य तात्काळ घटनास्थळी जावुन तक्रारदार यांचे जवळील डिजीटल व्हाईस रेकार्डर पोका धारेकर यांचे मदतीने बंद केले. तक्रारदार यांचे जवळील डिजीटल व्हाईस रेकार्डर बंद करुन आम्ही पंच क्रमांक 1 उगीले यांना विचारणा केली की, तक्रारदार पावले यांचेकडुन लाचेची रक्कम कोणी स्विकारली? तेव्हा सदरील खुर्चीवर बसलेल्या मजबुत बांध्याच्या ईसमाकडे अंगुली निर्देष करीत नमुद ईसम हे वेतन विभाग (माध्यमिक) लातूर येथील क्लार्क असुन त्यांनी तक्रारदार पावले यांचेकडुन लाचेची रक्कम आपले उजव्या हाताने स्विकारुन अंगातील शर्टचे छातीवरील डाव्या बाजुच्या खिषामध्ये ठेवली असल्याचे संागीतले. त्यावेळी आम्ही आमचेजवळील ओळखपत्र क्लार्क यांना दाखवून स्वतःची, दोन्ही पंच व सापळा पथकातील सर्व सदस्य यांची ओळख करुन देवुन सर्वांची अंगझडती घेणे बाबत विचारणा केली असता त्यांनी नकार दर्षविला. आम्ही वेतन विभाग (माध्यमिक) लातूर येथील क्लार्क यांना त्यांचे नाव गाव व पद याबाबत विचारणा केली असता त्यांनी आपले नांव राजेंद्र रघुनाथ भुतेकर वय 52 वर्ष पद कनिष्ठ लिपीक नेमणुक वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, (माध्यमिक शिक्षण विभाग) लातूर वर्ग 3 मुळ रा. जिजाऊ नगर, उस्मानाबाद ह.मु कोकाटे नगर, लातूर असे असल्याचे सांगितले. पंच क्रमांक 2 उपाडे यांचे मदतीने कनिष्ठ लिपीक भुतेकर यंाचे अंगातील शर्टच्या डाव्या बाजुच्या खिषातुन लाचेची रक्कम काढुन घेवुन पंच क्रमांक 1 उगीले यांचे मार्फतीने सापळा कार्यवाही दरम्यान लिहुन घेण्यात आलेल्या नोटांचे वर्णन व नंबरषी पडताळून पाहीले असता ते एकच असल्याचे निदर्षनास आले. त्यानंतर लोकसेवक भुतेकर यांना ताब्यात घेवुन लाप्रवि कार्यालय, लातूर येथे येवुन कार्यालयात अंधार करुन पंचासमक्ष कनिष्ठ लिपीक भुतेकर यांचे उजव्या हाताची, लाचेची रक्कम ठेवलेल्या शर्टच्या छातीवरील डाव्या बाजुच्या खिषाची व लाचेच्या नोटाची अल्ट्राव्हाईलेट दिव्याचे प्रकाषात पाहणी केली असता त्यांचे उजव्या हाताचे बोटास, लाचेची रक्कम ठेवलेल्या खिषाचे आतील बाजुस व लाचेच्या रक्कमेस अंन्थ्ा्रसिन पावडरची हिरवट चकाकी दिसुन आली. तसा सविस्तर संपुर्ण सापळा कार्यवाही पंचनामा हा दिनांक 15/01/2019 रोजी 15.00 ते 21.30 वाजेपावेतो करण्यात आला.तरी लोकसेवक राजेंद्र रघुनाथ भुतेकर वय 52 वर्ष पद कनिश्ठ लिपीक नेमणुक वेतन व भविश्य निर्वाह निधी पथक (माध्यमिक षिक्षण विभाग) लातूर वर्ग 3 मुळ रा. जिजाऊ नगर, उस्मानाबाद ह.मु कोकाटे नगर, लातूर यांनी लोकसेवक या नात्याने स्वतःच्या अधिकार पदाचा दुरुपयोग करुन त्यांना मिळणारे कायदेषीर परिश्रमीका खेरीज बक्षीस अथ्ावा प्रवर्तक दान म्हणुन तक्रारदार यांचे भविश्य निर्वाह निधीमधील रक्कम लवकर मिळवुन देण्याचे कामासाठी तक्रारदार पावले यांना दिनांक 15/01/2019 रोजी पंचासमक्ष 2,000/-रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 1,000/- रुपये घेण्याचे मान्य करुन सदरील लाचेची रक्कम दिनांक 15/01/2019 रोजी 18.40 वाजता पुरणमल लाहोटी षासकिय तंत्रनिकेतन लातूरचे गेटच्या बाजुस असणारे कृश्णा ज्युस सेटंरवर स्वतः स्वीकारुन स्वतःचा आथ्र्ािक फायदा करुन घेतला म्हणुन माझी त्यांचे विरुध्द कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 अन्वये सरकार तर्फे कायदेषीर फिर्याद आहे. ही फिर्याद दिली सही कुमार भ.दराडेद्व पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग लातुर.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.) **or**

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे ~~Nanasaheb Dnyandeo~~ **Rank** (पद): I (Inspector)

**No.**(क्र.): PBMH73435 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or**

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव)**:**

**District** (जिल्हा)**:**

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) . .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned by CamScanner

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पो.ठाणे अमलदार
पो.स्टे.शि.न.लातूर

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची**

**Name (नाम):** ~~NANASAHEB VISHWANATH D~~
**Rank(पद):** ~~I (Inspector)~~
**No.(सं.):** ~~PI~~ पो.ह.गुरसाळे HC1235

Scanned by CamScanner